म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५७८

# झुला

सुधा चोपेकर



REFBK-0025655
REFBK-0025655

संदर्भ काव्य

२५७८
२५६५५
९२।७८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
२५७८ २५६५५
क्र.
काव्य ९२।७८
शाखा (स्थल ...)

# झुला

सुधा चाफेकर

REFBK-0025655

REFBK-0025655

कॉन्टिनेन्टल

प्रकाशक :
अ. अ. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११ ०३०

■ ■

पहिली आवृत्ती ७ मे १९८८
प्रकाशन क्रमांक : १०२९

■ ■

© विजय वसंत चाफेकर
'विकास' रामवाडी, नौपाडा, ठाणे.

■ ■

किमत रुपये वीस फक्त

■ ■

मुखपृष्ठ – प्रभाकर, मुंबई.

■ ■

मुद्रक :
सौ. उषा ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर
९१४ सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०.

नवनवीन क्षेत्रात काम करताना माझी
प्रेरणा बनून राहिलेले माझे पती
श्री. वसंत चाफेकर
यांना

## प्रस्तावनेदाखल :

२५७८ २५६५५

कोणत्याही पुस्तकासाठी प्रस्तावनेचे प्रयोजन काय ते अजूनही नीटसे माझ्या ध्यानात आलेले नाही. अजूनही म्हणून म्हणतो, त्याला काही कारण आहे. कारण गेल्याच वर्षभरात किमान दहा पुस्तकांसाठी तरी मी प्रस्तावना लिहिल्या असतील. आणि तरी सुद्धा प्रस्तावनेचे काम मला नेहमीच त्रासदायक वाटत आले आहे. आणि त्यात पुन्हा प्रस्तावित पुस्तक कवितांचे असेल तर अधिकच. कथा, कादंबरी वा नाटक ही एक सलग वस्तू तरी असते आणि म्हणून त्या वस्तूचा सलग विचार तसा काहीसा सुकर असतो. पण पुस्तक जर कवितांचे असेल, तर मात्र प्रस्तावनाकाराची मोठीच पंचाईत होते. कारण प्रत्येक कवितेविषयी अलग बोलणे तसे सोपे असते. पण वेगवेगळ्या विषयांवरच्या अनेक कवितांचा एकत्र विचार करायचा म्हटले तर ते काम किती कठीण आहे, किंबहुना अशक्यप्राय आहे, हे जावे प्रस्तावकाच्या वंशा, तेव्हाच कळे.

या पुस्तकातील कवितांची लेखिका सौ. सुधा चाफेकर ही कु. शरयू सहस्रबुद्धे होती, तेव्हापासून आप्त म्हणून मी तिला ओळखतो. पण तिला कवितेचा नाद आहे, हे मात्र मला कालपरवापर्यंत माहीतच नव्हते. आणि तिनेच आपल्या कविता एकदा डोळ्यांखालून घालण्याचा आग्रह मला केला नसता, तर ते मला कदाचित कधीच कळलेही नसते.

योगायोग कसा विलक्षण असतो बघा. ज्या काळात सुधाने आपल्या कविता मला दाखवल्या, तो काळ असा होता, आणि तो फारसा दूरचा नव्हे, की जेव्हा जवळपास दर दिवसाआड नियमित रतीब घातल्यासारखा किमान एकतरी कविता-संग्रह ( ‘साहित्य संस्कृती मंडळा’च्या कृपेने ) माझ्याकडे न मागता येत असे. आणि पहिल्याने – म्हणजे कुतुहल जागे होते तोपर्यंत – मी त्या कवितांची पुस्तके न चुकता वाचतही असे. पण ती माझी चूक होती, हे बिनचूक लक्षात यायला मात्र वेळ लागला नाही. कारण कवी अनेक

असले, तरी त्यांनी खरडलेल्या बहुतेक सर्व कविता कशा अगदी एकसारख्या एक असत. त्यात कसला म्हणून फरक नसे. सर्वच कवितांत एक कर्कश आक्रोश तरी असे, अथवा बीभत्स संताप तरी. आणि या तथाकथित कवींना छंदोरचनेची काही किमान जाणही नसल्यामुळे आपण जे बेताल लिहितो, तेच काव्य होय; अशी त्यांची समजूत दिसली.

या असल्या कसल्यातरी निरर्गल कवितांचा मारा चालू असतानाच केवळ योगायोगाने याच वेळी ही घरंदाज, कुलीन, संयत, शांत, स्निग्ध, सौम्य, सोज्वल कविता मला वाचायला मिळाली. परिणामी दिलासा लाभला तो असा की, अजूनही जी आपल्याला भावते, अशी कविता कोणी-तरी, कोठेतरी लिहीत आहे. आणि तीसुद्धा अशा आजच्या काळात की जेव्हा या साध्या, सोप्या सहज समजणाऱ्या आणि सामान्यांच्या सामान्य भावना मुखर करणाऱ्या कवितांची फारशी चलती नसताना.

या कविता वाचत असताना प्रथम जी एक गोष्ट माझ्या ध्यानात आली, ती तशी चकित करणारी होती या सर्व कवितांची रचना गेल्या पाच-पंचवीस वर्षांतील फार करून असावी म्हणजे हा जो कालविशेष आहे, तो 'रविकिरण मंडळा'तील यशवंतादी लोकप्रिय कवींची कविता जन-मानसातून पार पुसली गेल्यानंतरचा, प्रामुख्याने मर्ढेकरांचा व तदनंतरच्या ग्रेससारख्या कवींचा.

बरे, या कविता जिने रचल्या आहेत ती पेशाने शिक्षिका आहे. आणि तिला आधुनिक मराठी कवितेच्या वाटचालीची चांगली जाण आहे. पण येथे बघावे, तर तिच्या कवितेवर आजकालच्या लोकप्रिय कवितेचे संस्कार कोठे यत्किंचितही – अगदी पुसटसुद्धा – उमटलेले आढळत नाहीत. म्हणजे तिच्या लेखी मराठी कवितेचे गेले अर्धशतक जसे अस्तित्वातच नाही. परि-णामी कविवर्य अनिल, कुसुमाग्रज, रेगे, बोरकरांपासून तो तहत आजच्या विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे इत्यादी कवींचेही कसले म्हणून संस्कार या कवितेने घेतलेले दिसत नाहीत. कवितेचा विषय, आशय वा रचनाविशेष यापैकी कोणत्याच बाबतीत ही कविता समकालीन कवितेशी कसले म्हणून नाते सांगत नाही.

या घटनेचा अर्थ असा नव्हे की, ही कविता स्वयंभू वा स्वतंत्र अशी आहे, तर तसेही नाही. तिचा ध्यास मुळातच प्रकाशनार्थ म्हणून कविता रचण्याचा फारसा दिसत नाही. तिचे लक्ष खिळलेले दिसते ते केवळ स्वतः-च्याच, स्वतःपुरत्याच मर्यादित अशा काही काही अनुभवांवर. आणि त्याबाबत तिला कसल्या म्हणून उसनवारीची गरजच भासली नसावी. कारण आपण कोणताही भावानुभव कवितेत सांगितला, तर तो केवळ स्वतःचाच नव्हे तर समस्त वाचकांचाही असेल याविषयी ती निःशंक होती.

आपला हा जो कोण वाचक असेल तो ' भाबडा, भावुक ' असणार, आणि ' साध्याच शब्दातुनि ' या कवितेत व्यक्त झालेले त्याचे भाव त्यालाही भावणार; अशी तिची भावना आहे. तिच्या कवितेत हा जो सर्वस्पर्शी भाव आहे, तो स्वाभाविकच घर या एकाच – निर्जीव असूनही सदैव सजीव असणाऱ्या – वास्तूला नाना परींनी आळवणारा, जागवणारा आणि त्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा असा. आता पुरुषाच्या लेखी तो स्वतः ज्या वास्तूत वास करतो, ते घर एकच असले, तरी स्त्रीच्या लेखी दोन घरे असतात. एक माहेरचे आणि दुसरे सासरचे. पहिले पित्याचे. दुसरे पतीचे. आणि त्या दोन्ही घरांची तिला सारखीच ओढ असते.

ही गृहिणी सासरी असली की जे माहेर ती सोडून आली, त्या माहेरच्या अगणित आठवणीत स्वतःला हरवून बसते. आणि क्वचित केव्हा माहेरी जाण्याची वेळ येते तेव्हा सासरच्या आठवणींनी तिचे आतडे तुटत राहते. येथे कित्येक कवितांतून तिची ही द्विधा वृत्ती जीवघेण्या शब्दांत प्रकट झालेली दिसते. आता माहेर म्हटले की त्या माहेराशी जे जे म्हणून निगडित आहे, त्याची चित्तवृत्ती सैरभैर करणारी सय येथे माहेरपणाच्या कवितांत उत्कटतेने जाणवते. अणि माहेर जर निसर्गरम्य अशा दूरच्या खेडेगावातील असेल, तर मग विचारायलाच नको. त्याच्या आठवणींनी घायाळ झालेली ही गृहिणी सासरीही सर्वस्वाने रमलेली व गुंतलेली असतेच.

आणि माहेर व सासर तिला सारखेच प्रिय असले, तरी या दोन घरांशिवाय आणखीही तिसऱ्या – मुळात अस्तित्वात नसणाऱ्या – मनोरम स्वप्नातील घराचे अनावर आकर्षण तिला भावत असतेच. कारण नव्या

घरातील सहचराच्या सहवासाची ओढ गात्रागात्रातून साद घालत असली तरी सासर म्हणजे काही प्रत्यक्षात उतरलेले स्वप्त नसतेच तेथेही असीम सुखाबरोबर असीम दुःखही नशिबी असतेच. तेव्हा येथे या ज्या घराकडच्या त्रिविध कविता आहेत. त्या केवळ 'भाबडचा, भावूक' वाचकानांच नव्हे तर तदितर वाचकांनाही हृद्य वाटतील अशा आहेत. हा झाला या संग्रहात ग्रथित केलेल्या कवितांचा एक भाग.

पण तदितर कवितांचा जो दुसरा व मोठा भाग आहे, तो तर 'भाबडा व भावुक' मुळीच नव्हे असा आहे. या दुसऱ्या भागात आजवरच्या जीवनात भोगलेल्या सुखदुःखांची अलिप्त अशी जशी उजळणी आहे, तशीच माणसाच्या मनोगतात व परिसरातील जगतात ज्या घडामोडी घडत असतात, त्यांची टीकाटिपणीही आहे. आणि ती, 'भाबडचा व भावुक' नव्हे अशा बिलंदर व चिकित्सक अशा व्यक्तीने केलेली आहे. या कवितात 'भाबडचा भावुक'पणाचा अंशमात्रही नाही या कवितांत माणसामाणसांच्या परस्पर संबंधातील गूढ ताणतणाव जसे टिपलेले आहेत, तसेच क्वचित केव्हा त्याच माणसांचे मुखवटेही अलग करून मुखवटचाआड दडलेले चेहरे-मोहरेही या कवितांत कोठे आढळतात. आणि उपहास वा उपरोधही येथे काही कवितांतून दाहकरूपात भेटतो. आणि या कवितातून हेही सतत जाणवत राहते की, एकेकाळची ही 'भाबडी भावुक' मुलगी तदनंतरच्या अनेक बऱ्यावाईट अनुभवांना आत्मसात केल्यानंतर आता बरीच शहाणी, धूर्त व चलाख झालेली आहे. थोडक्यात म्हणजे एका निरागस, अल्लड किशोरींचे जगजाणत्या पुरंध्रीत होत असलेले व झालेले परिवर्तन या कवितेने चित्रित केले आहे. हे झाले माणसांच्या जगाविषयी.

पण माणसांच्या जगापलिकडे निर्मनुष्य असे जे निसर्गनिर्मित सृष्टीचे जग आहे, त्याच्या रमणीय अप्रूपतेने भारलेल्या व भारावलेल्या चित्तवृत्तीची स्पंदने येथे काही काही भावजीवी कवितांतून जाणवतात. आणि हेही जाणवते की, माणसांच्या पलिकडे हे जे दुसरे जग आहे त्याचे जागते भान येथे काही नाजूक कवितांनी जपलेले आहे.

येथवर जे काही सांगून झाले, त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली

असावी अशी माझी समजूत आहे. येथवर निर्देशित केलेले सारे काही या कवितेत जरूर आहे. पण ते जे सारे आहे, ते येथे सामान्यत: संयत व शालीन रूपातच व्यक्त झालेले आहे. मध्यम वर्गातील एका सुखवस्तू कुटुंबात निर्वेध कालक्रमणा करणाऱ्या कुलीन स्त्रीचे जे भागधेय असते त्या भागधेयाच्या मर्यादेतील ही कविता आहे. पण या सुखवस्तू मध्यमवर्गीय माणसांच्या छोटया बेटाला वेढणारा जो अमर्याद महासागर आहे, त्याच्या रौद्रभीषण रूपाची वार्ताही या कवितेला नाही. सभोवारच्या राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक परिसरात नित्यश: जे वादळवारे घोंघावत असतात, त्यांची किंचिन्मात्रही झळ या कवितेला पोचलेली दिसत नाही. सारांश, एका सुसंस्कृत स्त्रीच्या प्रापंचिक सुखदुःखाची कहाणी म्हणजे ही कविता होय. ही जी काय मर्यादा आहे, त्या मर्यादेतच ही कविता समजून घ्यायला हवी.

येथे लक्षणीय कवितांच्या नामनिर्देशाचा मोह मी जाणूनबुजून टाळला आहे; कारण एखाद्या हृदयस्पर्शी कवितेचे रसग्रहण करायचे म्हटले असते, तरी त्यासाठी येथवरची सर्वच पृष्ठे खर्ची टाकावी लागली असती. म्हणून येथे कवितांची विशेषनामे नाहीत विशेषणे मात्र आहेत.

'शब्द माझे भाव त्यांचे' अशी स्वत:च्या कवितेविषयी ज्या कवयित्रीची भावना आहे, तिच्या शब्दरूप कवितांना 'भाव ज्यांचे' ते मनःपूर्वक प्रतिसाद देतील आणि तो प्रतिसाद अनुकूल असेल, याविषयी मी नि:शंक आहे.

**– माधव मनोहर**

घरातील सहचराच्या सहवासाची ओढ गात्रागात्रातून साद घालत असली तरी सासर म्हणजे काही प्रत्यक्षात उतरलेले स्वप्न नसतेच तेथेही असीम सुखाबरोबर असीम दुःखही नशिबी असतेच. तेव्हा येथे या ज्या घराकडच्या त्रिविध कविता आहेत. त्या केवळ 'भाबड्या, भावूक' वाचकानांच नव्हे तर तदितर वाचकांनाही हृद्य वाटतील अशा आहेत. हा झाला या संग्रहात ग्रथित केलेल्या कवितांचा एक भाग.

पण तदितर कवितांचा जो दुसरा व मोठा भाग आहे, तो तर 'भाबडा व भावुक' मुळीच नव्हे असा आहे. या दुसऱ्या भागात आजवरच्या जीवनात भोगलेल्या सुखदुःखांची अलिप्त अशी जशी उजळणी आहे, तशीच माणसाच्या मनोगतात व परिसरातील जगतात ज्या घडामोडी घडत असतात, त्यांची टीकाटिपणीही आहे. आणि ती, 'भाबड्या व भावुक' नव्हे अशा त्रिलंदर व चिकित्सक अशा व्यक्तीने केलेली आहे. या कवितात 'भाबड्या भावुक'पणाचा अंशमात्रही नाही या कवितांत माणसामाणसांच्या परस्पर संबंधातील गूढ ताणतणाव जसे टिपलेले आहेत, तसेच क्वचित केव्हा त्याच माणसांचे मुखवटेही अलग करून मुखवट्याआड दडलेले चेहरे-मोहरेही या कवितांत कोठे आढळतात. आणि उपहास वा उपरोधही येथे काही कवितांतून दाहकरूपात भेटतो. आणि या कवितातून हेही सतत जाणवत राहते की, एकेकाळची ही 'भाबडी भावुक' मुलगी तदनंतरच्या अनेक बऱ्यावाईट अनुभवांना आत्मसात केल्यानंतर आता बरीच शहाणी, धूर्त व चलाख झालेली आहे. थोडक्यात म्हणजे एका निरागस, अल्लड किशोरीचे जगजाणत्या पुरंध्रीत होत असलेले व झालेले परिवर्तन या कवितेने चित्रित केले आहे. हे झाले माणसांच्या जगाविषयी.

पण माणसांच्या जगापलिकडे निर्मनुष्य असे जे निसर्गनिर्मित सृष्टीचे जग आहे, त्याच्या रमणीय अप्रूपतेने भारलेल्या व भारावलेल्या चित्तवृत्तीची स्पंदने येथे काही काही भावजीवी कवितांतून जाणवतात. आणि हेही जाणवते की, माणसांच्या पलिकडे हे जे दुसरे जग आहे त्याचे जागते भान येथे काही नाजूक कवितांनी जपलेले आहे.

येथवर जे काही सांगून झाले, त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली

असावी अशी माझी समजूत आहे. येथवर निर्देशित केलेले सारे काही या कवितेत जरूर आहे. पण ते जे सारे आहे, ते येथे सामान्यतः संयत व शालीन रूपातच व्यक्त झालेले आहे. मध्यम वर्गातील एका सुखवस्तू कुटुंबात निर्वेध कालक्रमणा करणाऱ्या कुलीन स्त्रीचे जे भागधेय असते त्या भागधेयाच्या मर्यादेतील ही कविता आहे. पण या सुखवस्तू मध्यमवर्गीय माणसांच्या छोट्या बेटाला वेढणारा जो अमर्याद महासागर आहे, त्याच्या रौद्रभीषण रूपाची वार्ताही या कवितेला नाही. सभोवारच्या राजकीय, सामाजिक वा सांस्कृतिक परिसरात नित्यशः जे वादळवारे घोंघावत असतात, त्यांची किंचिन्मात्रही झळ या कवितेला पोचलेली दिसत नाही. सारांश, एका सुसंस्कृत स्त्रीच्या प्रापंचिक सुखदुःखाची कहाणी म्हणजे ही कविता होय. ही जी काय मर्यादा आहे, त्या मर्यादेतच ही कविता समजून घ्यायला हवी.

येथे लक्षणीय कवितांच्या नामनिर्देशाचा मोह मी जाणूनबुजून टाळला आहे; कारण एखाद्या हृदयस्पर्शी कवितेचे रसग्रहण करायचे म्हटले असते, तरी त्यासाठी येथवरची सर्वच पृष्ठे खर्ची टाकावी लागली असती. म्हणून येथे कवितांची विशेषनामे नाहीत विशेषणे मात्र आहेत.

'शब्द माझे भाव त्यांचे' अशी स्वतःच्या कवितेविषयी ज्या कवयित्रीची भावना आहे, तिच्या शब्दरूप कवितांना 'भाव ज्यांचे' ते मनःपूर्वक प्रतिसाद देतील आणि तो प्रतिसाद अनुकूल असेल, याविषयी मी निःशंक आहे.

– माधव मनोहर

घरातील सहचराच्या सहवासाची ओढ गात्रागात्रातून साद घालत असली तरी सासर म्हणजे काही प्रत्यक्षात उतरलेले स्वप्न नसतेच तेथेही असीम सुखाबरोबर असीम दुःखही नशिबी असतेच. तेव्हा येथे या ज्या घराकडच्या त्रिविध कविता आहेत. त्या केवळ 'भाबड्या, भावूक' वाचकानांच नव्हे तर तदितर वाचकांनाही हृद्य वाटतील अशा आहेत. हा झाला या संग्रहात ग्रथित केलेल्या कवितांचा एक भाग.

पण तदितर कवितांचा जो दुसरा व मोठा भाग आहे, तो तर 'भाबडा व भावुक' मुळीच नव्हे असा आहे. या दुसऱ्या भागात आजवरच्या जीवनात भोगलेल्या सुखदुःखांची अलिप्त अशी जशी उजळणी आहे, तशीच माणसाच्या मनोगतात व परिसरातील जगतात ज्या घडामोडी घडत असतात, त्यांची टीकाटिपणीही आहे. आणि ती, 'भाबड्या व भावुक' नव्हे अशा बिलंदर व चिकित्सक अशा व्यक्तीने केलेली आहे. या कवितात 'भाबड्या भावुक'पणाचा अंशमात्रही नाही या कवितांत माणसामाणसांच्या परस्पर संबंधातील गूढ ताणतणाव जसे टिपलेले आहेत, तसेच क्वचित केव्हा त्याच माणसांचे मुखवटेही अलग करून मुखवटयाआड दडलेले चेहरे-मोहरेही या कवितांत कोठे आढळतात. आणि उपहास वा उपरोधही येथे काही कवितांतून दाहकरूपात भेटतो. आणि या कवितातून हेही सतत जाणवत राहते की, एकेकाळची ही 'भाबडी भावुक' मुलगी तदनंतरच्या अनेक बऱ्यावाईट अनुभवांना आत्मसात केल्यानंतर आता बरीच शहाणी, धूर्त व चलाख झालेली आहे. थोडक्यात म्हणजे एका निरागस, अल्लड किशोरीचे जगजाणत्या पुरंध्रीत होत असलेले व झालेले परिवर्तन या कवितेने चित्रित केले आहे. हे झाले माणसांच्या जगाविषयी.

पण माणसांच्या जगापलिकडे निर्मनुष्य असे जे निसर्गनिर्मित सृष्टीचे जग आहे, त्याच्या रमणीय अपूर्पतेने भारलेल्या व भारावलेल्या चित्तवृत्तीची स्पंदने येथे काही काही भावजीवी कवितांतून जाणवतात. आणि हेही जाणवते की, माणसांच्या पलिकडे हे जे दुसरे जग आहे त्याचे जागते भान येथे काही नाजूक कवितांनी जपलेले आहे.

येथवर जे काही सांगून झाले, त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली

कवितेचे नांव पृष्ठांक


गहिरे निळे डोळे ... २४
का ? ... २५
डेकोरेशनसाठी ... २६
दरीतल्या तळ्याकाठी ... २७
पहिले वहिले ... २८
मध्यंतर ... २९
परतीचं तिकीट ... ३०
सैरभैर मन ... ३१
जयंत्या, पुण्यतिथ्या ... ३२
सदा मी अधाशी ... ३३
असहाय्य ... ३४
थकवा अनावर ... ३५
अबोल आसवं ! ... ३६
विशुद्ध प्रेम ... ३७
स्वर्ग साक्षात् ... ३८
अबोल झाले ... ३९
लेक माझी ... ४०
चंदेरी चांदण्यात ... ४१
जीवनाचा प्रवास ... ४२
शब्द ब्रह्म ... ४३
पडझड ... ४४
स्नेहगंध ... ४५
हे असेच असते : असेच होते ! ... ४६
संगत बकुळफुलांची ! ... ४७
खोपा वाळूचा ... ४८
निर्जीव खेळणं ... ४९
शिखंडी ... ५०

# ‘ झुला ’च्या निमित्तानं !

माझे पती, श्री. वसंत चाफेकर यांनी हा काव्यसंग्रह प्रसिद्ध करायचा अगदी हट्टच घेतला आणि माझी ताई, सौ. सुमति कानिटकर, मेव्हणे श्री. मधुदादा कानिटकर आणि मुलगा चि. विजय यांनी तो इतका उचलून धरला की, माझा नकार अगदी निष्प्रभ ठरला.

समृद्ध माहेर आणि निसर्गसौंदर्याने नटलेला परिसर यामुळे निरामय बालपण लाभलं. वडिलांची बहुश्रुतता आणि आईची आतिथ्यशीलता उपकारक ठरली.

कॉलेजच्या उमलत्या जगात शब्दगंगेचा उगम झाला. पण कौटुंबिक जीवनातील कष्टाखाली तो बराच काळ दडपून राहिला होता. विवाहानंतर आणि नोकरीच्या निमित्तानं अनेक अनुकूल–प्रतिकूल प्रवृत्तीची माणसं सहवासात आली. मानवी स्वभावाचे अनेक पदर उलगडले गेले. हळव्या क्षणी निसर्गही सख्यासारखा वाटू लागला. रसिकजन भोवती जमले. अन् माझी मैत्रीण सौ. शालिनी करंदीकर हिच्या ‘आता कशी प्रतिभा सरलीय ? ’ या एकाच मिष्किल प्रश्नानं मनात खोल खोल दडलेल्या शब्दाशयानं अक्षरशः उसळी मारली. या निर्मितीचं माझी सखी सौ. स्नेहलता महाजन हिनं भरभरून कौतुक केलं. कविता फुलत गेली. पण त्याच वेळी कर्तृत्वाला मर्यादा पडावी इतका प्रखर विरोध करणारी प्रभावळही होती. जबरदस्त जिद्दीमुळेच हे आव्हान पेललं गेलं असं म्हणावसं वाटतं. मात्र निर्मितीचं श्रेय सर्वांनाच द्यायला हवं.

‘ झुला ’तील कविता वेगवेगळ्या मासिकांतून आणि साप्ताहिकांतून यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या आहेत. आकाशवाणीवर प्रसारित झालेल्या आहेत. कराड येथील कवयित्री संमेलनातील, ठाणे येथे नुकत्याच झालेल्या ६१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील आणि इतर अनेक ठिकाणच्या कविसंमेलनांच्या व्यासपीठावरून त्यांचं वाचन झालेलं आहे. काही ठिकाणी

खास माझ्याच कवितावाचनाचे कार्यक्रमही झालेले आहेत. शक्य झालं त्या कवितांखाली तसा उल्लेख केलेला आहे.

काही वर्षांपूर्वी बरंचसं लिहून झाल्यावर श्री. माधव मनोहर म्हणजे आमचे बाळकाका यांनी कविता लक्षपूर्वक वाचल्या होत्या. बहुमोल मार्गदर्शनही केलं होतं. आणि आता 'झुला'साठी त्यांनीच प्रस्तावनाही लिहायचं कबूल केलं यापरतं दुसरं महान भाग्य कोणतं असू शकतं ?

'झुला'च्या छपाईचे काम 'श्री मुद्रण मंदिर'चे संचालक श्री. नागपूरकर आणि त्यांचे सहकारी यांनी खूप आत्मीयतेनं आणि अल्पावधीत करून दिलं माझे चित्रकार मित्र प्रभाकर यांनी अल्पपरिचय असूनही सुरेख मुखपृष्ठ काढून संग्रहाला सजवलं 'कान्टिनेन्टल प्रकाशन'चे पितापुत्र श्री. अनंतराव व श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी प्रकाशनाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक आभार. कवितांचं जाहीर वाचन करावं, त्या प्रसिद्ध कराव्यात असा प्रेमळ आग्रह माझी बहीण श्रीमती विद्या आगाशे आणि इतर अनेकांनी वेळोवेळी धरला त्यामुळेच हा काव्यसंग्रह संपन्न होत आहे. आमच्या घरातील माणसं म्हणजे श्री. चाफेकर, चि. विजय, सौ. माणिक आणि सून सौ. वंदना हे माझ्या कवितेचे पहिले श्रोते. त्यांनी त्या ऐकून घेतल्या आणि मनापासून दाद दिली. माणसं आपलीच असली तरी आभार मानणं अगत्याचं आहे.

कवितेतला निवेदक, 'मी' स्वत: कवी नसतो हा विचार जाणकार काव्यरसिकांना नव्यानं सांगायची गरज नाही. कवी भोवताली घडणाऱ्या घटना अगदी उत्कटतेनं अनुभवतो त्या आपणतो, इतक्या की त्या त्याच्याच वाटाव्यात. पण काव्य लिहिताना तो अलिप्त असतो. लिहून झाल्यावर तर कविता त्याची न राहता तिला सामोऱ्या आलेल्या प्रत्येक रसिक वाचकाची बनते. मूलत: कविता अनेक रिक्त स्थानं घेऊनच जन्माला येते. वाचकांना हे आपलेच अनुभव आहेत असं ज्यावेळी मनापासून वाटतं तेव्हाच ती खऱ्या अर्थाने पूर्ण होते. म्हणूनच आता मी माझी कविता आपणासारख्या रसिकांच्या हाती देत आहे.

**– सुधा चाफेकर**

# अनुक्रमणिका


| कवितेचे नांव | | पृष्ठांक |
|---|---|---|
| पुजारी | ... | १ |
| झुला | ... | २ |
| संजीवक क्षण | ... | ३ |
| तुझी निःसंग सोबत | ... | ४ |
| ओझरतं दर्शन | ... | ५ |
| क्षण एकच | ... | ६ |
| अशोक | ... | ७ |
| यक्ष-नगरी | ... | ८ |
| अवचित भेट | ... | ९ |
| प्रत्यक्षातच कविता जगले | ... | १० |
| घडता-मीलन | ... | ११ |
| वणवा | ... | १२ |
| प्रतिभेचं कोडकौतुक ! | ... | १३ |
| बीजेची चंद्रकोर | ... | १४ |
| रेशमी गुंता | ... | १५ |
| असाही अपेक्षाभंग ! | ... | १६ |
| रसायन | ... | १७ |
| झालो उपेक्षेचा धनी | ... | १८ |
| मोती तयार होतो | ... | १९ |
| मनातले-प्राणीसंग्रहालय | ... | २० |
| वचनबद्ध | ... | २१ |
| हायकू | ... | २२ |
| सुधारक | ... | २३ |

| कवितेचे नांव | | पृष्ठांक |
|---|---|---|
| गहिरे निळे डोळे | ... | २४ |
| का ? | ... | २५ |
| डेकोरेशनसाठी | ... | २६ |
| दरीतल्या तळ्याकाठी | ... | २७ |
| पहिले वहिले | ... | २८ |
| मध्यंतर | ... | २९ |
| परतीचं तिकीट | ... | ३० |
| सैरभैर मन | ... | ३१ |
| जयंत्या, पुण्यतिथ्या | ... | ३२ |
| सदा मी अधाशी | ... | ३३ |
| असहाय्य | ... | ३४ |
| थकवा अनावर | ... | ३५ |
| अबोल आसवं ! | ... | ३६ |
| विशुद्ध प्रेम | ... | ३७ |
| स्वर्ग साक्षात् | ... | ३८ |
| अबोल झाले | ... | ३९ |
| लेक माझी | ... | ४० |
| चंदेरी चांदण्यात | ... | ४१ |
| जीवनाचा प्रवास | ... | ४२ |
| शब्द ब्रह्म | ... | ४३ |
| पडझड | ... | ४४ |
| स्नेहगंध | ... | ४५ |
| हे असेच असते : असेच होते ! | ... | ४६ |
| संगत बकुळफुलांची ! | ... | ४७ |
| खोपा वाळूचा | ... | ४८ |
| निर्जीव खेळणं | ... | ४९ |
| शिखंडी | ... | ५० |

| कवितेचे नांव | | पृष्ठांक |
|---|---|---|
| अंगण म्हणाले | ... | ५१ |
| पाऊलवाट | ... | ५२ |
| जावयाचा क्षण आला ? | ... | ५३ |
| एकासवे लाख | ... | ५४ |
| साक्षात्कार | ... | ५५ |
| आधार | ... | ५६ |
| प्रश्नचिन्ह ? | ... | ५७ |
| दूर राहिला माझा गाव | ... | ५८ |
| सन्मान व्हावा म्हणून | ... | ५९ |
| वाटेवरची–भेट | ... | ६० |
| निसर्ग आणि मन | ... | ६१ |
| काटयामधुनी फुलायचे | ... | ६२ |
| फुलासारखं गीत माझं | ... | ६३ |
| असे जगावे ! | ... | ६४ |
| कोडे ? | ... | ६५ |
| सुने सुने भासते | ... | ६६ |
| गंधित क्षण | ... | ६७ |
| मोठे मासे ... लहान मासे | ... | ६८ |
| तृप्ती | ... | ६९ |
| साखर पेरणी | ... | ७० |
| प्रेम हवे मज | ... | ७१ |


झूला

२५८८
काव्य २५६६५
२५८८

# पुजारी

भाबडे भावूक डोळे
काव्य माझे वाचती
साध्याच या शब्दातुनी
भाव त्यांचे देखती ॥

शब्द माझे भाव त्यांचे
मीच हो त्यांची ऋणी
स्वप्न वेड्या जीवनाचे
तेच हो माझ्या धनी ॥

ज्यामुळे शब्दास माझ्या
आगळा हा रंग लाभे
गोफ त्यांच्या जीवनाचा
उकलले मी फक्त धागे ॥

"काव्य माझे !" माझे कसे ?
प्रेरणा तर त्यांचीच ना !
ज्यांचे असे त्यांनाच ते
अर्पिते करुणाघना ॥

२–७–७७

# झुला

निंबोणीच्या झाडाला
झुला बांधला ऽऽऽ गं
झुला बांधला ।

झुल्यासंगे जीव माझा,
वरखाली जाहला गं ।
वरखाली जाहला ।

आखाजी[1]चा सण आला
भाऊ मुळा[2] कां न आला ?
का ऽऽ न आला ऽऽ गं ?

निंबोणीची हिरवी पाने
कातीव चंद्रकोरी परमाने
नाना शंकाकुशंकांनी
जीव धास्तावला गं ऽऽऽ
जीव धास्तावला ।

झोका वर जाता,
भाऊ दृष्टीला पडला गं ऽऽऽ
दृष्टीला पडला ।

वेडया मनिचा हर्ष माझा
गगनाला भिडला ऽऽऽ गं
गगनाला भीडला ।

(१) आखाजी – खानदेशात अक्षत्तृतीयेला आखाजी म्हणतात.
(२) मूळ येणे – माहेरी न्यावयास माहेरचे माणूस येणे.

२६–६–७८
आकाशवाणी प्रसारण

# संजीवक क्षण

माझ्या आयुष्याची दोरी
हाती अलगद धरी
देई झुला झुलवून
जीव होई खालीवरी ...

माझ्या जीवनाची वेल
अमृताने पोशियली
तुझ्या प्रेमासवे आई
दारी फुले जाईजुई ...

तुझ्या प्रेमात न्हालेला
क्षण वाटे नवा नवा
किती दिस साथ मिळे ?
मनी शंकेचा काजवा ...

थकलेला हात तुझा
माझ्या माथ्यावरी फिरे
अशा संजीवक क्षणी
कालचक्र स्थीर व्हावे ...

२९–७–७७

# तुझी निःसंग सोबत

तुझी निःसंग सोबत
मना लावी फार ओढ
तुझी निःशब्द भेट
जपलेली आटोकाट ।

तुझ्या डोळ्यातले भाव
मऊ मुलायम भारी
तुझ्या ओठातले गीत
माझे स्वप्न जरतारी ।

स्वप्न अधुरेच न्यारे
मना ओढ लावणारे
नको पूर्णत्वाचा शाप
आणि जागृतीचा उःशाप ।

४-४-७९

# ओझरतं दर्शन

चांदोबाचं चांदणं ? छे, हे तर
बाळाचं हसणं, निष्पाप गोजीरवाणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
युवतीच्या गालावरचं गुलाबी लेणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
वेलीवरच्या फुलांचं, रुपडं लोभसवाणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
नर्तकीच्या नूपुरांचं तालबद्ध झंकारणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
गंगेच्या पात्रातील मनसोक्त डुंबणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
ऋषिमुनींच्या तपाचं पारणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
हिमगिरीचं शीतल शांत झगमगणं ।

पुनवेचं चांदणं ? छे, हे तर
परमात्म्याच्या मूर्तीचं
ओझरतं दर्शन ।

८–१०–७६
रविवार – सकाळ, पुणे.

# क्षण एकच

क्षण हसले, क्षण फुलले
आनंदे मन माझे
क्षण जाता आणि निघुन
हिरमुसले मन माझे ...... १

क्षण आला गंधयुक्त
वायुहि तो शांत मंद
क्षण जाता आणि निघुन
चोहिकडे सुंदकुंद ...... २

मेघांच्या राशीतुन
क्षण तळपुन, क्षण उजळुन
क्षण जाता आणि निघुन
तम दाटे चपलेविण ...... ३

क्षण आला जवळी तू
पाजळीत स्नेहज्योत
क्षण जाता आणि निघुन
उरले मी एकलीच ...... ४

क्षण एकच, क्षण एकच
सिंचियतो अमृतकण
त्याच क्षणास्तव मानव
वेचियतो तन, मन, धन ...... ५

२६-३-५४
'मीनल' मासिक पुणे
आकाशवाणी प्रसारण.

# अशोक

उंच अशोकाचे झाड
तळातून वर नेते
हिरव्या रंगावरुन दृष्टी
निळाईत झेप घेते ।

अशोकाचे झाड नव्हे
हा तर झुलता मनोरा
खोड दडे आतल्या आत
वाटे पानांचा फुलोरा ।

तरीसुद्धा झाड पाहून
मन उगाच उदास होते
पानं पाहून वाटते जसे
वीर बसले पाडून खांदे ।

अशोकाच्या झाडासवे
सय जानकीची येते
आठवाने मन तिच्या
झाडासवे दोलावते ।

अशोकाचे उंच झाड
अग्निबाण झेपावणारा
भेद माझ्या भावविश्वाचा
घेतो त्याचा पर्णपिसारा ।

टोकदार, तकतकीत पाती
मनात काही खुपसून जाती
आनंदांच्या क्षणांनाही
उदासली चढे कांती ।

२९-३-७७

# यक्ष-नगरी

खोपोलीचा घाट, रातराणी उतरली
अचानक दृष्टीपुढे, यक्षनगरी अवतरली ।

लक्षदीप झगमगले, लक्षदीप उजळले
भोवती जरी होते, काळोखाचे सापळे ।

दरीआड झाला जरी, प्रकाशाचा गाभा
डोंगर फोडून दृष्टी, बनू पाहे सुभगा ।

राहून राहून मला, आठवण तिची येते
भूलोकीच्या स्वर्गामध्ये, रंगून मी जाते ।

२९–३–७७

# अवचित भेट

क्वचित् केव्हातरी
दृष्टीला दृष्टी भेटते
टाळतांना नजर मात्र
मरण बरे वाटते ।

चालण्यातला डौल तुझा
मंद पावलात अडखळतो
उष्ण झरा रोमरोमी
खळकन् वहात जातो ।

लक्ष असून लक्ष नाही
भासवायचे नाटक चाले
का ? कशाला ? प्रश्नामुळे
उत्तर असून अवसान गळे ।

मार्च, ७७

# प्रत्यक्षातच कविता जगले

सौभाग्याचे लेणे ल्याले
आज घरी मी आले
हासत;
आज घरी मी आले ।

दबकत, बिचकत उंबरठ्यावर
पाऊल माझे पडले
हासत,
आज घरी मी आले ।

नव्हता वाडा, नव्हति हवेली
दोन खणांची लांबट खोली
आयुष्याचे स्वप्नच धूसर
तिथेच मी अनुभवले
हासत,
आज घरी मी आले ।

कुणी म्हणाले कविता फुलली
कुणी म्हणाले कविता सरली
सरली कसली ? कविता तर मी
प्रत्यक्षातच जगले
हासत,
आज घरी मी आले ।

११-१०-७६

# घडता – मीलन

दोन खुळे जीव, एकमेका भेटले रात्री ।
दृष्टीभेट घडता, सोनाळले अंतरी ।

दोन खुळे जीव, एकमेका भेटले गात्री ।
स्पर्शभेटीत आनंदाच्या, तेजाळले अंतरी ।

दोन खुळे जीव, एकमेका भेटले सरित् पात्री ।
जलक्रीडेत जवळिक, संगमोत्सुक मैत्री ।

दोन खुळे जीव, एकमेका भेटले मार्गी ।
हाती हात घेऊन, वहात गेले दूरवरी !

दोन खुळे जीव, एकमेका भेटले क्षितिजी ।
लाल पिवळे किरण, पसरले भूमिवरी ।

३०–३—७७

# वणवा

आज दूर डोंगरावर
कुणी साजरी करी दिवाळी
गर्द काळ्या संध्याकाळी
कुणी लावल्या दीपावली ?

दुरून डोंगर भासे मला
यक्ष किन्नरांची भूमी
मध्य रात्रीच्या स्वप्नातली
वाटत होती जादूनगरी ।

वाटते अवसेचे आभाळ
डोंगरावर उतरले
चमकणाऱ्या रुपेरी ताऱ्यांचे
बनले सोनियाचे गोळे

३०–३–७७

# प्रतिभेचं कोडकौतुक !

प्रतिभेचं कोडकौतुक
पुरवावं तरी किती ?
क्षणभर बसू देत नाही
मनाला माझ्या रिती ।

हृदयावर होतात
सारखेच आघात
ओठावर उमटतात
त्यांचेच पडसाद ।

लाडक्या लेकीसारखा
लाडका हट्ट
पदर धरून बसवते लिहायला
मिठी मारून घट्ट ।

हळव्या मनावरचे
ओलेसुके घाव
शब्दात झिरपतात
त्यातले नाजुक भाव ।

मनस्वी मनाच्या तालावर
नाचावं तरी किती ? ... कसं ?
कधी कधी वाटत
कशाला हे मन 'असं' !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संग्रह शाखा (स्थल प्रत)

डिसेंबर, ७६

# बीजेची चंद्रकोर

माहेराच्या वाटेवर
डोळे खिळले गं माझे
बीजेचीही चंद्रकोर
नभी हासे अन् विराजे  * * *

दारी उभी मी एकली
दूर माझा भाऊराया
मन आतुरले माझे
भाऊराया ओवाळाया  * * *

नको हासू चंद्रकोरी
मज एकली बघून
कशी कळेल गं तुला
मनातली ओढाताण ?  * * *

वाटे सोडूनिया सारे
क्षणी माहेराला जावे
भाऊरायास गं माझ्या
नेत्री साठवूनी घ्यावे  * * *

माहेराची आठवण
हेलावतो माझा जीव
कसा कळेल गं तुला
माझ्या मनातला भाव ?  * * *

नित्य खळाळत वाहे
तिथे प्रेमाचा गं झरा
कलेकलेपरी तुझ्या
नाही त्याला गं उतारा  * * *

१७–१–५४ आकाशवाणी प्रसारण

# रेशमी गुंता

सोडवत बसलेय रेशमी गुंता
वाटतं अर्धा सुटत आला
थोडं झटकून उभं रहावं
तर पदर पदर गुंतलेला। * *

धागे त्याचे मुलायम मऊ
सांगतात दूर नको जाऊ
थोडी केली दंगामस्ती
वाटतं गालात खुदुखुदु हसती। * *

लावली शक्ती सोडवण्या गाठी
सुरगाठीही बनतात पक्क्या
व्यर्थ वाटे गेला वेळ
गुंतागुंतीचा साराच खेळ। * *

रेशमी धागे मऊ मऊ
ठेवतात मला घट्ट जखडून
शक्ती माझी असता अचाट
मला ठरवतात अगदीच पुचाट।

मीही मानते नाजुक बंधनं
गुंतून बसते त्यातच सदा
सुटायचं कुणा निर्गुणासाठी ?
मन तर केलंय आधीच आदा। * *

शेवटपर्यंत हाच खेळ
मऊ मुलायम रेशमी धाग्यांचा
येईल कुणी जर त्यातून सोडवायला
गुंतूनच राहील पाय त्याचा। * *

१५-४-७७

# असाही अपेक्षाभंग !

असाही कधी अपेक्षाभंग होतो
चौकशीच्या खिडकीतून
सरळ जबाब मिळतो ।
कधी कधी पहिल्याच बसमध्ये
नंबर लागतो ।
सरकारी टेबलावरून दडपणाशिवाय
चटकन् कागद पुढे सरकतो

अन्

समिती नेमल्याशिवाय
निर्णयच जाहीर होतो ।
चोखंदळ माणूस आपल्याला
मनापासून दाद देतो ।
अपेक्षा नसता एखाद्याचा,
आपल्यासाठी जीव तुटतो,
अन् स्वप्नातल्या परीचा
आपल्यावरच जीव जडतो

असाही कधी अपेक्षाभंग होतो
असाही कधी अपेक्षाभंग होतो ।

२३–६–७८
रविवार सकाळ, पुणे.

# रसायन

आतल्या आत हिसळतंय
उकळतं रसायन ......
हसऱ्या चेहऱ्यानं
झाकण केलंय सीलबंद ।

वर लिहिलंय, अनुभवाचं अनुपान
घोटा-घोटाचं प्रमाण, पचनी पाडायचंय
कमी पडलं तर अवसान गळेल
जास्त झालं, तर सारंच कोलमडेल ।

७-११-७७

...२

# झालो उपेक्षेचा धनी

माझी बायको, माझी मुले
ज्यांच्यासाठी सौख्य फुले
त्यांची दुखणी, औषधपाणी
त्यातच गायली प्रेमाची गाणी ।

आता मात्र माझा मीच
त्यांचा नाही उरलो कुणी
अडगळ बनलो माझ्याच घरी
झालो उपेक्षेचा धनी ।

२२–१२–७८

# मोती तयार होतो !

सारं काही शांत असता
टपकन् खडा आत पडतो
पार ढवळून निघून तळ
मनातला गाळ वर तरंगतो ।

स्थीर व्हायला सारं पुन्हा
कितीतरी काळ लोटतो
गोंधळाच्या काळात मात्र
शिंपलीत मोती तयार होतो ।

मार्च ७८

# मनातले–प्राणीसंग्रहालय

: १ ;

मनातला ससा दबा धरून बसतो
फुंकरीनं सुद्धा धडधडू लागतो ।

: २ :

मनातला पारवा सतत घुमत रहातो
इवल्या इवल्या डोळ्यांनी टकामका पहातो ।

: ३ :

मनातला हत्ती कधी झुलत रहातो
येत्या नव्या क्षणांचे उत्साहाने स्वागत करतो ।

: ४ :

मनातला जिराफ मान उंचावून पहातो
काटे लागले तोंडाला की झटकन् मागे सरतो ।

: ५ :

मनातला सिंह कधी डरकाळ्या फोडतो
सारीच मेलेली सावजं पाहून निराश होतो ।

: ६ :

मनातला मोर पिसारा फुलवतो
नील घन पाहून, घननीळाला साद घालतो ।

७–१०–७७
रविवार सकाळ, पुणे.

## वचनबद्ध

वचन दिलंय ना एकदा तुला
शब्द कधीच मोडणार नाही ।
हात दिलाय ना हातात तुझ्या
साथ कधीच सोडणार नाही

मंतरलेली सात पावलं
चाललेय् सख्या तुझ्यासंग
तुझ्याशिवाय एकही पाऊल
अडखळल्याशिवाय रहाणार नाही

तुझ्याशिवाय ? ...... नकोच ना पण !
अरे, विसरले कशी मी ?
तूही आहेसच की वचनबद्ध !

२५-१-७८

# हायकू !

लवलवत्या फांदीवर
चिवचिवणारे जीव
कुठे दोनच दोन
तर कुठे फांदीच सजीव ।

* * *

उमलणाऱ्या कमळांची
देठंच तुटली
झेपावणाऱ्या पतंगाची
दोरीच तुटली ।

* * *

पतंगाच्या झेपेनी
ज्योतच विझली
नावेच्या धडकांनी
लाटच दुभंगली ।

* * *

तुटलेली कळी
मिटलेली ओठ-पाकळी
शब्द-गंध, भेटायचे कधीकाळी ?

* * *

सूर्य गरगर फिरतोय
आता पाण्यात डुबेल
दूर रस्त्यावर, अंधार पसरेल

* * *

दोघांनी अगदी
टोक गाठलं,
मध्ये फक्त न संपणारा रस्ता ।

* * *

इवलासा पक्षी, दुरून उडत आला
साऱ्या रानात, गलबला केला ।

२७-१०-७९

# सुधारक

इवलीशी टिकली
पुसून टाकली
कां ? तर म्हणे, मी
रूढी मोडून टाकली ।

नाजुक कंकणं
दूर फेकली
कां ? तर म्हणे, ही
बेडी जुन्या जमान्यातली ।

कुठलं चांगलं ?
नि कुठलं आपलं ?
भुलवतं ते चांगलं ?
खुलवतं ते आपलं ?

छे, छे, भावलं ते जवळ केलं
काही कापलं, काही वाढवलं
संस्कृतीचं ओझं झुगारलं
सुधारणांचं डमरू वाजवलं
खरच का मी काही नवं केलं ?

६–१२–७७

# गहिरे निळे डोळे

गहिरे निळे डोळे
अस्मानही झुकून गेले
ऋजुतेच्या मार्दवाने
जाई जुई दरवळे ।

टपोऱ्या द्राक्षांचे घोस
रसबिंदू ठिबकले
हिरण्मयी कुंतलांनी
वारंवार न्याहाळले ।

खोल खोल त्यात पहाता
वाईट इतकचं वाटलं मला
नजर चुकवता चुकवता
भाव दिसले हरवलेले ।

३-३-७८

# कां ?

कां ? कशाला जाणवते
बारिकशीही अर्थछटा
कां उगाच पहावा वाटे
आरपार फसवा मुखवटा ?
कां साऱ्यांच्या मौनाचाही
सतत रुततो शब्दन् शब्द
कां हसतांनाही नकळत
डोळा असा डबडबतो ?

२-८-८१

# डेकोरेशनसाठी !

डेकोरेशनसाठी,
बनवून घेतलाय,
एक देव्हारा,
सुंदर; शिसवी, चकचकीत, जाळीदार ।

बिचाऱ्या देवाला तरी
आजवर असं निवांत घर
कुठं मिळालं होतं कां ?
सहन करावेच लागत होते
ते षोडश उपचार
नि नैवेद्याचं विलोभनीय नेत्रसुख

मी मात्र ...... मी मात्र त्याला
मुक्त केलाय,
ह्या सगळ्या त्रासातून
घासून पुसून
चकचकीत ठेवते
फक्त डेकोरेशनसाठी ...... डेकोरेशनसाठी !

२४-९-७९

# दरीतल्या तळ्याकाठी

भोवताली होती, हिरवीगार झाडी ।
चार सहा झोपडयांची, चिमुकली वाडी ।

घरात होती लहानमोठी, भाताची कणगी ।
कुणालाही मिळायची, पसाभर वानगी ।

हांकेवर होतं, गहिरं निळं तळं ।
तळ्याचं पाणी होतं, पवित्र निर्मळ ।

तळ्याच्या भोवती, टेकडयांचा वेढा ।
टेकडीवरचा रस्ता, कुठे सरळ, कुठे तेढा ।

वळणावळणाची नागमोडी वाकणं ।
वाकणाच्या पलीकडे, दृष्टीला झाकणं ।

तळ्यातल्या पाण्यात, प्रतिबिंबांची गर्दी ।
टपकन् पडता, तळ्यात काही
एकमेकांवर आदळती ।

वाटतं अशा तळ्याकाठी,
आयुष्यभर रहावं ।
शहराच्या गर्दीत मुळी ना मिसळावं ।

५-१-७७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५७८
क्राय २५६५५
(स्थळ प्रत)

# पहिले–वहिले

पहिलाच दृष्टीक्षेप तुझा
माझा अगदी कापूर झाला

पहिलाच ओझरता स्पर्श
दर्वबिंदूत भाव न्हाला
पहिलीच गाढ मिठी
साखर विरघळली

पहिलीच विरहरात्र
पंखांची पिसं गळली
पहिलीच पुनर्भेट
शिडात स्वप्न संचरली

२८–३–७७

# मध्यंतर

अर्धी रात्र जरा विसावली
अर्धा चंद्र नभी थांबला
अर्ध्यावरती संसाराच्या
सुखद मध्यंतर झाला

विशी-तिशीतिल भावुक स्वप्ने
अनेक त्यातिल विरुनी गेली
चाहुल नसता नवीन सौख्ये
आज अचानक दारी पातली

सुखदुःखाचे विणीत धागे
काळ सरकला चोरपावली
सुखात रमलो, दुःख झेलली
एकमेकां बनत सावली

आज वाटले सरून गेली
जीवनातली नवीन स्वप्नं
शांत भासते जीवन सारे
उदया यावे नवीन तारे

८-२-७७

# परतीचं–तिकीट

परतीचं तिकीट मिळत होतं
तेव्हा काही घेतलं नाही
वाटलं मुदतीत परत फिरणं
जर आपल्याला जमलं नाही ...... !
होते काही क्षण असे
परतायचंय हेच विसरून गेले
आता मात्र झालीय घाई
पण तिकिटांची रांग, खूपच लांब
राहिलंच पाहिजे उभं तिथं
जरी मोडली आता कंबर
हाती येईल तिकीट तेव्हा ......
जेव्हा पुढे सरकतील नंबर !

२८–३–७७
६१ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन, ठाणे.

# सैरभैर मन

मनाचा वेग
ताशी किती मैल ?
मापता तरी येईल का
जर सुटलं सैल ?
क्षणात इथं, क्षणात तिथं
दाही दिशा धुंडाळून, परत घरट्याकडं
क्षणात होतं सैरभैर
क्षणात निराधार
क्षणात रमतं स्मृतिगंधात
तर क्षणात डुबतं आसवात /
दु:ख, शोक आनंद
मनाचेच सारे खेळ
थोडा प्रयत्न केला
तर जमेल त्यांचा मेळ ।

डिसेंबर ७६

# जयंत्या, पुण्यतिथ्या

जयंत्या, पुण्यतिथ्या
स्मारकं, पुतळे
प्रतिवर्षी हार चढतात
टाळ्या वाजवता वाजवता
वर्ष पुढे सरकतात
तेजस्वी अल्पायुषीच असतो
दीर्घायुषी
निधी जमवत बसतो ।

४-१-८२

# सदा मी अधाशी

सदा मी अधाशी
सदा मी अधाशी
खेळावे वाटते
नित्य या जळाशी ।

डोंगर कुशीत
हिरवी संपत्ती
तुडवीत जावे
डोंगर माथ्याशी ।

फेकावा तिथून
धुक्याचा पदर
रानाची बाळे
घ्यावीत कुशीत ।

ओलांडून जावे
साळीचे शेत
मनात रहाती
मनीचे बेत

केसात माळाव्या
रानच्या तुळशी
असूनी दौलत
उशाशी पायाशी ।

सदैव छळिते
मनीची उदासी
आठवतो मज
रानचा मरवा
भरल्या शहरी
अशी मी उपाशी ।

११-६-८२

# असहाय्य

द्रौपदीचे ओढले, अेकदाच केस
अन् घडलं महाभारत ।
आमच्या ओढतात रोजच झिज्या
विचकट हसून असंख्य दुःशासन ।
पांचालीचे वस्त्र फेडायचा
एकदाच प्रयत्न, तोही असफल ।
तिला होता, चक्रधारी कृष्णाचा
भक्कम आधार ।
आम्ही मात्र,
असुनि नाथ
तरी अनाथ ।

५-१-७७

# थकवा अनावर

चालता चालता येतो
कधी थकवा अनावर
पण थांबावे असे
एक तरी घर ?
अशा निरिच्छतेचाही जेव्हा
अर्थ लागतो भलता
भुतं पाहून असली
शितं घ्यावी आवरुन ।

३–१०–८१

# अबोल आसवं !

वाढत्या जबाबदारीला
उरला नाही अंत ।
सारं सोपवून स्त्रीवर
पुरुष बनला संत । * * *

घरचं, दारचं करता करता
तिला नाही उसंत
मुलांना तर कशाचीच
वाटत नाही खंत । * * *

मौजमजेत जगतात
मन ठेवून स्वस्थ ...
मायेचा ओलावा
स्त्री–हृदयाचा ठेवा
गमावून बसली सारा
सौख्याचा झरा । * * *

मायाळू शब्दांच्या
झाल्या स्फोटक ठिणग्या
असमर्थ पण त्या
करायला जाग्या । * * *

मनानं चडफडते
शरीरानं धडपडते
सुखाची स्वप्नं कवटाळून
अबोल आसवं ढाळते । * * *

२१–११–७६

# विशुद्ध प्रेम

राधेचा जीवलग
गोकुळीचा घननीळ।
परस्परांसाठी त्यांचा
जीव तुटे तीळ तीळ ।।

प्रभुच्या भक्तीचा
मीरेला जडला छंद ।
प्रभुविना तिला नसे
जीवनाचा दुजा आनंद ।।

आदिवासी भिल्लीणीचा
जडे जीव रामावर।
रामालाही उष्टी बोरे
मेवा वाटला सुंदर ।।

पुराणातल्या गोष्टींबाबत
जर नाही आपण अश्रद्ध ।
आजही कां नसावं ?
स्त्री-पुरुषाचं नातं, प्रेमाचं विशुद्ध ?

सर्वस्वी विशाल व्यक्तीमत्वावर
स्त्रीची जडते अपार श्रद्धा।
भोळया भाबडया भक्तीवर
लोभावतात सत्पुरुषसुद्धा ।।

क्षुद्र संकुचित स्थायीभाव
तिथे सदाच लोप पावतो ।
काहींच्या शब्दकोषी मात्र
त्याशिवाय दुसरा अर्थच नसतो ।।

डिसेंबर १९७६
कवयित्री संमेलन, कराड

# स्वर्ग साक्षात्

उंच उंच हिमकडे
नि खोल खोल काश्मिरी दऱ्या
हलती झुलती सरोवरे
नि निळया निळया नद्या गहिऱ्या
नक्षीदार चिनार पाने
उंच उंच पाईन फर
उतरते चढते मोहक रस्ते
सभोवार कुरणं हिरवी गार ।
झुळु झुळु झऱ्यांची साथ
रंगीबेरंगी फुले नि
कुसुमकोमल मृदुल हात
सफरचंदी रंगछटात
काश्मीर वाटे स्वर्ग साक्षात्
स्वर्गीय सफर, शाही शिकारा
तरत्या बागा नि नंदनवनात निवारा
डुलणारी होडकी, हलणारे 'दल–जल'
काश्मीर दरीतले निसटते क्षण
जीवन करतात अनमोल ।

४–१०–७७

# अबोल झाले

मी कधीच अबोल झाले
भोवतीच्या गलबल्यात
मी कधीच हे ओळखले
की शब्द मिटावा ओठात
हे शब्दांचे गज,
उभे, आडवे, तिरके
का थरथरते काळीज माझे नवखे ?
ह्या दगडी भिंतींवर
शब्दांची उडते ठिकरी
हे असेच दुमडुन ओठ
अंगार गिळते अंतरी.

५-९-८१

# लेक माझी !

लेक लाडकी ही माझी
आहे फार गुणी बाई
गोड गोड बोलण्याने
चित्त वेधुनिया घेई ।
वावराने तिच्या माझे
घर वाटे भरलेले
दूर जाता थोडा वेळ
सारे कसे सुने सुने ।
माझ्या लाडक्या लेकीची
मीच काय करू स्तुती ?
नसता मी याल जरी
तुम्हा येईल प्रचीती ।
नाजुकशी लेक माझी
मला फारच जपते
लहान मी होता कधी
तेव्हा आई माझी होते ।
घरी, दारी, शेजारीही
सर्वांनाच लावी लळा
काळजीने तरी सुद्धा
कधी दाटे माझा गळा ।
आज नाही तरी कधी
जाईलच ती सासरी
विरहाची चाहूलही
करी मनाला बावरी ।

ठाणे, २०-१२-७६

# चंदेरी चांदण्यात

चंदेरी चांदण्याला
असता जर चंदनी वास
तासन् तास हुंगायचा
लागला असता ध्यास ...
चांदण्याला जर असते
इंद्रधनुचे रंग
बनविले असते मी
मोरपिशी अंग ...
चंद्राच्या शिंपलीतून
जर ओघळते मोती
रातोरात बनवली असती
माळ त्यांची रूपवती ...
चंद्राच्या परडीतून
नाजुक फुलं जर गळती
झेला गुंफून वेणीमध्ये
हौसेनं का माळली नसती ? ...
पण खरं सांगू कां तुम्हाला
चंद्राला लाभलं नाही जरी
मानवी शब्दांचं सुंदर लेणं
रातभरच्या हितगुजात
भासत नाही त्याचं उणं ! ...

(रविवार सकाळ, पुणे)
६-१-७७

# जीवनाचा प्रवास

अर्धामुर्धा प्रवास
सुखरूप पार पडला
ऊनसावलीच्या खेळात
नेटाने मार्ग काढला.
वाटायचं आलं हाती
ज्यासाठी मन ओढे,
पुढं जाऊन पहावं
तर तुटलेले डोंगरकडे.
मार्ग बदललेले, मार्ग चोखाळले
बरे वाईट सारे, अनुभवा आले.
पायात होती ताकद,
मनात होती हिंमत,
काटचाकुटचातूनही
ठाम पाय रोवले.
शिणत चालली काया
भरुन आला ऊर
सहज पाहिलं वळून
दोन्ही किनारे दूर.
दृष्टी झाली क्षीण
धुक्यात हरवली वाट
हातात आलाय हात,
त्याचीच मिळाली भक्कम साथ
तर पुढचाही मार्ग काटण्याची
उमेद आहे माझ्या मनात.

नोव्हेंबर ७६

## शब्दब्रह्म

शब्दांना असतो का स्वतःचा अर्थ ?
छे, ह्या तर नुसत्या अर्थवाहू होडचा ।
भावनांची ने आण करणाऱ्या
किनाऱ्याकडून किनाऱ्याकडे
संदेश पोचवणाऱ्या ।
शब्दात नसला जर भावनांचा हुंकार
तर वाटतात नुसतेच 'अकार' 'उकार'
शब्दात दडलेले नवे नवे रंग
जीवनात उठवतात अनेक तरंग ।

२२-१२-७६

# पडझड

झुरणारं आकाश
खाली उतरलं
पक्ष्याची शीळ भरारत गेली
झाडं कशी गप्प गप्प झाली ।
पंखांची फडफड
कसली ही पडझड
असल्या कातरवेळी ?

२०-१२-८१

# स्नेहगंध

काटे मिळतात अनेकांकडून
तुझ्याकडून फुले
गंधवती झाले मी
मन माझे डुले ।
भेट झाली माध्यान्ही
फुलत चाललीय दुपार
उत्तररात्रीही न सरावा
स्नेहगंध अपार ।

१९-६-७९

# हे असेच असते : असेच होते !

शब्दहि जुळले यमकहि जुळले
गीत असे हे परी रिते
पुसू नका असे कां ते ...
हे असेच असते ... असेच होते ।
गुणहि जुळले छत्तिस सारे
त्यांचे परी असे कां ते ?
पुसू नका, हे असे कां ते ...
हे असेच असते ... असेच होते ।
धूप जळाले, दीप उजळले
उपचारहि सारे सरले
गीत गायिले, हात जोडले
जुळले नाही परि नाते
हे असेच असते ... असेच होते

३-११-८२

# संगत बकुळफुलांची !

धुंद सकाळी, धुंद मनाने
सुखद गारवा, झेलित गात्री
वेचवेचिली बकुळ फुले मी,
तूही वेचिली ती मम गात्री ।
सुकून गेले स्मृतिचे झेले
सुकून गेले बहर बकुळीचे
सुगंध जपला अजून मीही
तूही असशील जपला तोही ।
पण, सांज सकाळी, वेळी अवेळी
जेव्हा मी मज आठवत बसते
नकळत अलगद मनात माझ्या
सौरभ लहरी पसरत जाते ।
सांग मला पण, संगत सरता
बकुळ फुलांची संगत स्मरते ?

१६–१०–७८

# खोपा वाळूचा !

अथांग नदीच्या काठी
संध्याकाळच्या कलत्या उन्हात,
थापून थोपून, खोपा बांधला
ओल्या वाळूचा ।

डोंगराला वेडावत
हळूच हात काढला
खोप्यातून ।

किंचित दूर सरले,
खोपा ढासळत होता
भुईसपाट ।

खिन्न नजर,
न्याहाळत बसली
हाताला चिकटलेले, ओले वाळूकण
कितीतरी वेळ ।

नदीकिनारी, रोज हे असंच होतं ।
अन् तरीही
कलत्या उन्हात
रोज खोपा बांधते
तितक्याच उत्साहाने ।

१८-१-८३
'शब्दांगण' मासिक ठाणे

# निर्जीव खेळणं

एक दिवस असा येतो की,
मुठीतल्या मातीचं सोनं होतं ।
प्रत्येक शब्द झेलला जातो,
वळाल त्या दिशेला
सूर्य उगवतो

एक दिवस असा उगवतो
मुठीतल्या रत्नांचा कोळसा होतो
जाल तिथं अपमानानं
काळजाचं पाणी पाणी होतं

एक दिवस असा,
एक दिवस तसा,
मानवा तू तर
दैवाच्या हातातलं,
खेळणं बापुडवाणं

सारंच भविष्य तुझं
दैवाच्या किल्लीवर फिरणारं
निर्जीव खेळणं

१७-११-७६

# शिखंडी

हे तर शिखंडी –
शरसंधान, तेही अबलांवर ?
कणा नसलेले लुब्रे
त्यांच्या पाठीशी हात ।
तरीही प्रगतीकडून प्रगतीकडे
चाल दौडीची ।
विरोधाची धार वाकवून
वरात नंदीबैलांची ।

जानेवारी १९८१

# अंगण म्हणाले !

अंगण म्हणाले, " तुझी कुंपणरेषा
जरा पुढे ढकल,
घरात येणाऱ्या पावलांमध्ये
असू देत काही अनवाणीही !
उठू देत त्यांच्या सजीव पावलांचे
ठसे, माझ्या संस्कारक्षम मनावर.
त्यांच्या स्वागतासाठी मला नाही
सजवलेस तरी चालेल.
तशी त्यांची अपेक्षाही नाही.
पण धूळ माखल्या पावलांचा
स्पर्श उंबरठ्याला घडव
शीतल, प्रेमळ मृद्‌गंधाचा
तिलक तुझ्या भाळी जडव !"

रविवार सकाळ, पुणे
१७-९-७८

२५५८
२५६५५
काव्य

# पाउलवाट

कितीदा तरी पाह्यलीय
उदासवाणी पतझड
अन् डवरलेली पुन्हा ती वनराजी ।
बहरणारा नि सुकणाराही
मनमोहक वसंतबहार ।
आभाळानं पांघरलेली
ढगांची भुरकट शाल
नि हुरहुर लावणारं
शरदाचं शुभ्र चांदणं ।
आज मात्र क्षितिजकडेवर
उमटलेली दिसली एक
अस्पष्ट पाऊलवाट
कळत, नकळत भेडसावू लागली
उमलणारी प्रत्येक पहाट ।

११-१०-७८

# जावयाचा क्षण आला ?

नेत्रकडा ओलावल्या
पुसे ओठावरले गीत
हृदयामधले चैतन्याचे
घुसमटले संगीत ।
मनि शंकेचे उठले मोहोळ
गलबलला हा जीव खुळा
जावयाचा क्षण आला ?
दाटुनिया आला गळा ।
फुललेल्या गुलाबाचे
कांटे आले का वाटयाला ?
मावळतीचे सूर्यबिंब
बोलावी का हळू मला ?
पाय देती त्याला साथ
मन मात्र ओठंगले
वेडचा तुझे अजूनही
काय आहे गुंतलेले ?

५–७–७८

# एकासवे लाख

एकासवे लाख आले
लाखासवे अनेक
एक ठिबकला लाख ठिबकले
लाखासवे अनेक ।
एका थेंबात ठिबकले मी
लाख धारात वर्षले मी
लाख धारात आजच्यांना
तृप्त मी करणार आहे
कारण ठाऊक नाही का ?
आजची मी, उद्या नसणार आहे.

२-७-७७

# साक्षात्कार

खंडाळ्याच्या घाटात
बोगद्याच्या पोटात
उगाच मन धास्तावतं
उगाच मन कातर होतं ।
क्षणात हसरं जग
क्षणात मिट्ट अंधार
उंच उंच डोंगराकडे,
त्यावर तोल सावरीत उभे
एक चिमुकले झोपडे ।
उगाचच वाटतं, त्या तिथं
चार दिवस रहावं, अगदी एकटं ।
अगदी एकटं, तपस्वी मुनीसारखं
जगाचं चिंतन करीत ।
जगाचा भार ? कुणी दिलाय डोक्यावर ?
कशाचं ओझं ? कोण बाळगणार ?
पण वाटतं खरं असं ।
का कोण जाणे ?
त्या खोल दरीत,
गर्द झाडांच्या राईत,
करवंदाच्या जाळीत,
भिल्लाच्या पोरासारखं, नाचावं, बागडावं,
अडाणी जगात, अनाडी मन घेऊन,
हुंदडावं मनमुराद ।
वाटतं घ्यावी खोल उडी,
दरीच्या कुशीत, मारावी दडी
पण असेल का कुणी तिथं ?
अलगद झेलायला ?
कुणाच्या रूपात ?

२३–११–७६

# आधार

माझ्या शेल्याची
उरलीयत लक्तरं,
तरीही वाटतात का तुला
आकर्षक ?
कारण, भरजरी दिमाख
तू पाहिला होतास ।
धगधगीत अग्नीची
उरलीय राख
तरीही जाणवतं का तेज ?
कारण, तेव्हा तू
दिपला होतास ।
माझ्या कादंबरीच्या
झाल्यायत चिंधड्या,
उरी कवटाळतोयस त्या ?
कारण तू,
रसात न्हायला होतास ।
अजूनही मानतोयस मला ?
हाच केवढा आधार !

२३-७-७९

# प्रश्नचिन्ह ?

मानवी जीवन
रेतीवरल्या पाऊलखुणा
वादळ वाऱ्यात, लाटांच्या माऱ्यात
पुसटून जाती, तरीही एक
छंद दिवाणा,
चिरकीर्तीचा, संधी साधण्याचा
मावळतांनाही वळून पहाण्याचा
वेडा की खुळा ?
वेडा की खुळा ?

३०-१-७९

# दूर राहिला माझा गाव

या नगरी विसावले
सान थोर नवलाख
तो दूर राहिला
माझा छोटा गाव ।
ह्या संसारामधि
यंत्र पसारा फार
परि आठवतो मज
चुलीतला तो धूर ।
हे सारे होती
चित्रपटामधि दंग
मज आठवतो परी
गोड रसाळ अभंग ।
लखलखते दिसती
उड्डाणांचे तळ
मज स्मरते परि
ठेक्यातिल घुंगुरमाळ ।
गजबजल्या मार्गी
काढित वाट अनेक
गर्दीत असे परि
एकलीच मी पथिक ।

९-२-७८

# सन्मान व्हावा म्हणून

सन्मान व्हावा आपला म्हणून
मान सर्वांना देत गेले
बोलू नये उणं कुणी
म्हणून गोडच फक्त बोलले
तरीही अवमान, उणी दुणी
आली माझ्या भाग्यचक्रात
स्पष्ट बोलायचं सोडून
उगाच केली यातायात ।

२२-१२-७८

# वाटेवरची–भेट

सख्या तुला वाटेवर
धुंडित बसतं माझं मन
येणार साजण म्हणून
तेच बनतं धूळीकण ...
सख्या तुला वाटेवर
गाठण्याची बांधते खुणगाठ
समोर दिसलास जरी तू
फिरवते मीच पाठ ...
नाही दिसलास तर रुसते
दिसेल पुन्हा म्हणून समजावते
दिसतोस समोर तेव्हा मात्र
न दिसतास तरच बरं म्हणते ...

# निसर्ग आणि मन

ओल्या आषाढात,
भर दिवसा,
मेघांनी भारलेलं आकाश,
जसं दाटलेलं मन * * *

स्वच्छ शरदांत
भर दुपारी,
ढगांचा कापूस, तरंगतो आकाशात
जसं पिंजलेलं मन * * *

माघाच्या गारठ्यात
मध्यरात्री
गारठतो सारा निसर्ग गात्री
जसं गोठलेलं मन * * *

सुगंधी चैत्रात
सांजसकाळी
बहरते सारी सुंदर सृष्टी
जसं मोहरलेलं मन * * *

डिसेंबर ८२

# काट्यामधुनि फुलायचे

सुखदु:खाचे कढ हे उरिचे
बोगनवेली तुला सांगते
काटचातुनही फुलायचे हे
तत्त्व तुझे मी अंगिकारते ।
शेतामंदी बहरे बाभुळ
कर्णफुले मी कानि घालिते
अंकावरति खोपे ल्यावे
सुगरिण पक्ष्यांचे हे झुलते ।
घायपातही काटे भरली
शेतांचे का बांध राखिते
निवडुंगाला लाल फुलांची
नक्षी पाहुन मनी हरखते ।
काटचामधुनि फुलायचे अन्
झुलायचे अन् राखायाचे
काटे भरल्या वाटेवरुनी
पुढे पुढे अन् चालायाचे ।

२३-१-८५
ठाणे.

# फुलासारखं गीत माझं

फुलासारखं गीत माझं
दुरूनच वाच
सुकेल निःश्वासानंही ।

कळीसारखी प्रीत माझी
चटकन् जाण
फुलणारच नाही
थोड्या उशिरानंही ।

परागाचं मन माझं
अलगद झेल
अुडून जाईल ना
छोट्या फुंकरीनंही ।

ठाणे, नोव्हेंबर ८४

# असे जगावे !

कसे जगावे ?
असे जगावे,
जगण्यातिल त्या अर्थ कळावा ...
कसे पुसावे ?
असे पुसावे,
रागलोभ साराहि गळावा ...
सारे जग मग सुंदर होते
मित्रत्वाचे नाते जडते ।
श्वास असेतो ध्यासामध्ये
मन अपुले गुंतून रहावे
असे जगावे ...
असे जगावे ।

२०-३-८८

# कोडे ?

सागरातल्या असंख्य लाटा
कुठुनि येती, जाति कुणिकडे ?
समोरच्या त्या वाळुरणातिल
कणाकणाचे मजला कोडे ।
अश्वत्थाची सतेज पाने
सदैव त्यांची सळसळ चाले
जीवनातल्या ह्या चक्राचा
अर्थ नेमका कुणि ना जाणे ।
अंधाऱ्या रात्रीच्या वेळी
आकाशामधि असंख्य तारे
अर्थ तयांच्या लुकलुकण्याचा
परस्परांना कळतो का रे ?
पृथ्वीवरती असंख्य मानव
जन्मा येती आणिक जाती
कोण कशास्तव मनात झुरतो ?
ठाऊक नसता पुढिल सुसंगति ?

९-२-७७

# असे जगावे !

कसे जगावे ?
असे जगावे,
जगण्यातिल त्या अर्थ कळावा ...
कसे पुसावे ?
असे पुसावे,
रागलोभ साराहि गळावा ...
सारे जग मग सुंदर होते
मित्रत्वाचे नाते जडते ।
श्वास असेतो ध्यासामध्ये
मन अपुले गुंतून रहावे
असे जगावे ...
असे जगावे ।

२०-३-८८

# कोडे ?

सागरातल्या असंख्य लाटा
कुठुनि येती, जाति कुणिकडे ?
समोरच्या त्या वाळुरणातिल
कणाकणाचे मजला कोडे ।
अश्वत्थाची सतेज पाने
सदैव त्यांची सळसळ चाले
जीवनातल्या ह्या चक्राचा
अर्थ नेमका कुणि ना जाणे ।
अंधाऱ्या रात्रीच्या वेळी
आकाशामधि असंख्य तारे
अर्थ तयांच्या लुकलुकण्याचा
परस्परांना कळतो कारे ?
पृथ्वीवरती असंख्य मानव
जन्मा येती आणिक जाती
कोण कशास्तव मनात झुरतो ?
ठाऊक नसता पुढिल सुसंगति ?

९–२–७७

# सुने सुने भासते

तांदूळपाणी ओवाळणारे,
आज तुझे हात नाहीत ।
स्नेहदीप पाजळणारे,
आज तुझे डोळे नाहीत ।
उंबरठ्यावर येता आई,
प्रथम तुझी आठवण येते
भरलं माहेर असूनही,
आज सुने सुने भासते ।
" आलात ? दमलात !
बसा ताई ! "
आज शब्द कानी आले
शब्दामागची माया मात्र
कुठे कशी गमावून बसले ?
वेडी का मी ? तुलना नको
बजावूनही मन भांबावले ।
तडजोड, अटी, करारनामे
सारे मोडून डोळे भरले ।

५-८-७८

# गंधित क्षण

सायंकाळी मंद समीरण
वेलीवरती झोके घेतो
पारिजातकावरी माझिया
असंख्य मोती उकलित जातो ... ।
हळूच स्पर्शुनि निशिगंधाला
गंध त्यातला चोरुनि नेतो
रातराणिवर अगणित पेले
मादक गंधे भरुनि टाकितो ... ।
गंध भारला चंचल वारा
अंगणि माझ्या खिळुनि राहतो
वेढुनि माझ्या घरट्याला तो
गंधलेपने चढवित बसतो ... ।
चाहुल येता अरुणाची त्या
चोहिकडे तो उधळुनि जातो
मनात माझ्या परी दडवुनी
गंधित क्षण, तो दुरुनि हासतो ... ।

फेब्रुवारी ७७
आकाशवाणी प्रसारण

# मोठे मासे .... लहान मासे !

" मोठे मासे लहानांना गिळतात
म्हणून लहानांनी थव्यांनी रहायचं ।
पण ... पण थव्यातलेच मोठे (?)
लहानांना गिळू लागले तर !
भागवायची का त्यांची भूक ?"
" कां तुझ्या डोळ्यांत अश्रू ?
आतून पेटलेलं हे तळं
तुझ्या अश्रूंनी विझणार का ?"
" काय म्हणालास ?
हे आपलं तळं का ?"
" हो हो हे आपलंच तळं
अरे, तळ्यात राहून ... वैर कशाला ?
कां ? गलबललास ?
वेड्या, कसला हा गोंधळ
उगाच मनात ?"
" छोटे मासे ... मोठे मासे ...
पेटलेलं ... अन् तरीही आपलंच तळं ...
डोळ्यांतला अश्रू ... मोठ्यांची भूक ?"

१२-११-८१

## तृप्ती

स्वप्न साकारले
शब्द झंकारले
आर्त निळ्या गाण्यातुन
अर्थ नवे उमलले ...
स्पर्श चांदण्याचे
श्वास चंदनाचे
एकरूप होता
निःश्वास तृप्तीचे ...
सूर गोड गवसला
जीवन गीतातला
हृदय तार छेडिता
पूरिया आळविला ...
वृक्ष पर्णहीन ते
क्षणात सर्व डवरले
जीवनात माझिया
सप्तरंग उधळले ...

नोव्हेंबर ७६

# साखर पेरणी !

हलव्याचा दाणा,
खूप पाकवलेला
वरून बसली साखर
आत दडून असतो
चिमुकला स्नेहकण ।
अवती भोवती सतत
चालू असते साखर पेरणी
शब्द वाटतात मिठ्ठास गोड
पण स्नेह असतो का मनी ?
हवी कशाला शब्दांची भुलवणी ?
स्पष्ट बोलायलाही कणखर लागतं मन ।
वरची साखर झडली तरी उरतो ना स्नेहकण ?
परखड मतामागचही जाणकार
जाणतोच सरळ मन !

# प्रेम हवे मज

प्रेम हवे मज, असे हवे की
ज्यात नसे कामुकता लवही ।
साथ हवी मज, अशी हवी की
जीत असे भावुकता नुसती ।
स्वप्न हवे मज, असे हवे की
ज्यात फक्त चारुताच भरली ।
जाण हवी मज, अशी हवी की
जीत फक्त रसिकताच उरली ।

८-९-७८

REFBK-0025655
REFBK-0025655



**सौ. सुधा वसंत चाफेकर,**
एम्. ए. बी. एड्.

सौ. सुधा वसंत चाफेकर, माहेरच्या शरयू (सरला) सहस्रबुद्धे, यांचे बालपण खानदेशातील भडगाव या छोटचाशा गावी निसर्गसानिध्यात गेले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या काव्यात अहिराणी भाषेतील शब्द जागोजागी आढळतात.

त्यांचे वडील कै. त्र्यंबक बाळकृष्ण सहस्रबुद्धे यांचेकडून त्यांना साहित्यातील गुणग्राहकतेचा वारसा मिळाला आहे. संस्कृत साहित्यातील सुंदर सुंदर कलाकृतींचे त्यांच्या समवेत केलेले वाचन त्यांचे शब्दभांडार समृद्ध करण्यास उपयोगी पडले, आणि संवेदनक्षम, प्रेमळ व हळव्या मनाची त्याला साथ मिळाल्यामुळे त्यांची कविता जन्माला आली.

इंटरमिजिएट पास होऊन विवाह झाल्यानंतरचे सर्व शिक्षण सुधाताईंनी नोकरी व घरसंसार संभाळून मोठचा जिद्दीने पुरे केले. गेली अठरा वर्षे त्या ठाणे येथील 'महाराष्ट्र विद्यालयात' अध्यापिका आहेत. या उदयोन्मुख कवयित्रिचा हा जरी पहिलाच काव्यसंग्रह प्रसिद्ध होत असला तरी कवितेचा छंद त्यांनी कॉलेजात असल्यापासून जोपासला आहे. या संग्रहातील बऱ्याचशा कविता वेगवेगळ्या मासिकातून व साप्ताहिकातून प्रकाशित झाल्या आहेत आणि कविसंमेलनातून वाचल्या गेल्या आहेत.